# Shri Gajanan Seva
## Bay Area, California



## Pradakshina and Prasad

# || प्रदक्षिणा ||

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद् गुरुरायाची , माझ्या श्री गुरु रायाची
झाली त्वरा सुरावर विमान उतरायची ,झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची

पदोपदी अपार झाल्या पुण्याच्या राशी , झाल्या पुण्याच्या राशी
सर्वही तीर्थे घडली आम्हा आदि करुनि काशी ,
धन्य धन्य . . . . . .

मृदुंग टाळ घोळ भक्त भावार्थे गाती , भक्त भावार्थे गाती
नामसंकीर्तने नित्यानंदे नाचती ,
धन्य धन्य . . . . . .

कोटी ब्रह्म हत्या हरिती करीता दंडवत , हरिती करिता दंडवत
लोटांगण घालिता मोक्ष लोळे पायात ,
धन्य धन्य . . . . . .

गुरुभजनाचा महिमा न कळे आगमा निगमांसी , न कळे आगमा निगमांसी
अनुभव ते जाणती जे गुरु पदीचे रहिवासी ,
धन्य धन्य . . . . . .

प्रदक्षिणा करोनि देह भावे वाहिला , देह भावे वाहिला
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहिला
धन्य धन्य . . . . . .

गजानना गजानना श्रीमद्ध सद्‌गुरु गजानना

गजानना गजानना रक्षी सगळ्या भक्तगणा

गजानना गजानना अवलीया तु गजानना

गजानना गजानना भक्त वत्सला गजानना

गजानना गजानना शेगावीच्या गजानना

गजानन गजानन  गजानन गजानन गजानन गजानन

गजानन गजानन  गजानन गजानन गजानन गजानन

# || प्रसाद ||

प्रसाद हा मज द्यावा देवा | प्रसाद हा मज द्यावा
सहवास तुझाची घडावा  देवा प्रसाद हा मज द्यावा देवा ||

निशीदिनी प्रभुचे  नाम स्मरावे | विसर तुझा न पडावा देवा
प्रसाद हा मज द्यावा देवा | प्रसाद हा मज द्यावा ||

हृदय मंदिरी तुवा बैसुनी | ध्यान योग मज द्यावा देवा
प्रसाद हा मज द्यावा देवा | प्रसाद हा मज द्यावा ||

हरि भजनामृत निशीदिनी पाजूनी | जन्म  मृत्यु  चुकवावा देवा
प्रसाद हा मज द्यावा देवा| प्रसाद हा मज द्यावा ||

आत्मसुता परी  प्रसाद  द्यावा | वियोग तव न घडावा देवा
प्रसाद हा मज द्यावा देवा| प्रसाद हा मज द्यावा ||
सहवास तुझाची घडावा  देवा प्रसाद हा मज द्यावा देवा ||